# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# नवे शैक्षणिक धोरण भविष्य घडविणारे : संजीव चव्हाण

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात सखोल भर पडू शकते. पारंपारिक शिक्षण पद्धतीपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रम हे व्यापक आहेत. त्यामुळे विद्यार्थी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. अभ्यासक्रमात आपण जे शिकतो त्याचा उपयोग आपल्याला आयुष्यात करता आला पाहिजे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले.



**पाटण : कार्यशाळेत बोलताना संजीव चव्हाण, व्यासपीठावर मान्यवर.**

पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी. डी. कॉलेजमध्ये सुधारित अभ्यासक्रमावरील कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी भूगोलशास्त्र विभागाची बी. ए. भाग दोन व गणितशास्त्र विभागाची बी.एस्सी भाग दोन या वर्गासाठी एन.ई.पी. २.० साठी सदर कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. विषयतज्ञ म्हणून डॉ. के. डी. कुच्चे, प्रो. डॉ. एम.टी. गोफणे, प्रो.डॉ. एम. ए. पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. डी.आर. फडतरे, डॉ. एस.एस. तडाखे, डॉ. एच.व्ही काटे यांची उपस्थिती होती.

डॉ. एस.डी. पवार म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात जे बदल झाले आहेत ते स्वीकारावे लागतील. प्रत्येक विषयाचे वेगळे महत्व आहे. त्याचा अभ्यास सर्वांगाने होणे आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रमाबद्दल ज्या शंका असतील त्यावर चर्चा करून त्याचे निराकरण सदर कार्यशाळेमध्ये करण्याचा प्रयत्न राहील. आंतरविद्याशाखीय संबंधामुळे नवीन ज्ञान शाखा निर्माण होत आहेत. त्याचाही विचार केला जावा.

द्वितीय सत्रामध्ये विषयतज्ञ म्हणून प्रो.डॉ. व्ही.आर. वीर, डॉ. पी.आर जाधव, प्रो.डॉ. आर.एस. शिखलगार यांनी भूगोलशास्त्रातील पर्यावरणशास्त्र आणि नकाशाशास्त्रातील प्रात्यक्षिक या विषयावर मार्गदर्शन केले. दोन्ही विषयाच्या कार्यशाळा यशस्वीरित्या झाल्या. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील जवळपास १७५ प्राध्यापक उपस्थित होते.

गणितशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डी.आर. फडतरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. एस.एस. पवार यांनी केले. डॉ. संदीप तडाखे यांनी आभार मानले.